# खंडेलवाल महाविद्यालयातर्फे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'!

देशोन्नती 06-01-2023

## कृषी प्रदर्शनीत शिक्षक-विद्यार्थ्यांनी केली जनजागृती



अकोला ▪ स्थानिक डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने, विद्यापीठ क्रीडांगनामध्ये आयोजित ॲग्रोटेक-२०२२ या राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शनि व कृषी महोत्सवामध्ये विशेष परवानगीने शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचा 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' असा स्टॉल लावण्यात आला होता.

प्राचार्य डॉ जगदीश साबू यांच्या मार्गदर्शनाखाली, क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्टॉल मध्ये समन्वयक आणि महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स यांनी स्टॉलला भेट दिलेल्या समाजातील मान्यवर, शेतकरी, शाळा- महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी आणि इतर सुमारे ५ हजार नागरिकांना सायबर गुन्हे आणि त्या बाबतच्या सुरक्षे विषयी सविस्तर माहिती दिली. सायबर सुरक्षा टिप्स असलेले माहितीपत्रक वितरीत करण्यात आले.

यावेळी उपक्रमाचे समन्वयक, डॉ. हरिदास खरात यांनी उपक्रमाचा उद्देश आणि महाविद्यालयाची भूमिका स्पष्ट केली. प्रदर्शनातील या स्टॉलचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले. कुलगुरूंनी, सायबर क्राईम मोठ्या प्रमाणात होत असून सायबर सुरक्षा नितांत गरजेची आहे यासाठी समाज प्रबोधन आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी विस्तार शिक्षण विभागाचे संचालक डॉ. धनराज उंदिरवाडे, रजिस्ट्रार डॉ. सुरेंद्र काळबांडे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश नागरे, अधिष्ठाता कृषी डॉ. शामसुंदर माने, चेअरमन, स्टॉल मॅनेजमेंट, डॉ. नितीन पत्की, मुख्य शिक्षण विस्तार अधिकारी डॉ.उमेश चींचमलातपुरे, प्रा. डॉ. नितीन कोंडे, प्रा. डॉ. अतुल वराडे, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजी नागरे, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय देवडे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. रोहन सिरसाट, डॉ. प्रफुल्ल घुगे आणि सायबर वॉरियर्स शितल साखरे, वैष्णवी बेलंगे, रेणुका नाळे, रोशनी वांडे, आदित्य खाडे, गणेश अग्रवाल, श्रेया वाखारे, साक्षी देव, पौर्णिमा उपस्थित होते.

### या विषयांवर जनजागृती

फेक एसएमएस, फेक कॉल्स, डमी फेसबुक अकाऊंटस याविषयी लोकांनी विचारलेल्या पश्नांची उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले. 'ओटीपी' ऐवजी 'व्हेरिफिकेशन कोड' असे सांगून कॉल करून फसवणूक केली जात असल्यामुळे कोणीही याला बळी पडू नये आणि आवश्यकता नसेल तर इंटरनेट बंदच ठेवावे, टू-स्टेप व्हेरिफिकेशन करावे, अनोळखी व्यक्तीला मोबाईल देऊ नये, अशा विविध प्रकारची महत्त्वाची माहिती सांगून जनजागृती केली.